महा मेट्रो

PUNE METRO

## “महा मेट्रो, ट्रॅफिक पोलीस आणि स्थानिक नागरिकांन सोबत चर्चा सत्र”

पुणे २२ : आज दिनांक २२ डिसेंबर रोजी रिच - २ कार्यालयामध्ये निर्माणाधीन मेट्रो मार्गिकेच्या कर्वे रोड आणि नळ स्टॉप येथील वाहतूकीच्या नियोजना बाबत सर्व पर्यायांची साधक बाधक चर्चा करण्यात आली. याचबरोबर वाहतूक हि चक्राकार किंवा दुहेरी करावी या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकी मध्ये स्थानिक नगरसेविका श्रीमती. माधुरी सहस्त्रबुद्धे, डीसीपी (ट्रॅफिक पोलीस) श्रीमती. तेजस्वी सातपुते, वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षक श्रीमती. प्रतिभा जोशी, रिच - २ चे कार्यकारी संचालक श्री.अतुल गाडगीळ, महाव्यवस्पथापक (जनसंपर्क) डॉ . हेमंत सोनावणे, स्थानिक नागरिक श्री. प्रशांत इनामदार, श्री.अभिजित आठवले आणि मेट्रोचे इतर अधिकारी उपस्थित होते.

सदर बैठकी मध्ये या रस्त्यावरील वाहतूक चक्राकार कि दुहेरी पद्धतीची असावी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये वाहतुकीचे योग्य नियोजन करतांना परिसरातील शाळकरी मुले,पादचारी,वाहतूकया सर्व गोष्टीचा विचार करण्यात यावा असे सुचविण्यात आले. शिवाय झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित नागरिकांनकडून काही पर्यायी सूचना सुचविण्यात आल्या. तसेच पोलीस वाहतूक विभाग द्वारे ट्राफिकचे योग्यनियोजन करण्यासाठी ट्रॅफिक विभागाला महा मेट्रो द्वारे पुरेसे ट्रॅफिक वार्डन उपलब्ध करून देण्यात येणारआहे.या व्यतिरिक्त एस.एन.डी.टी. विद्यापीठ, अभिनव चौक,आठवले चौक, लागू बंधू रस्ता, प्रभात रोड जंक्शन, लोकूर चौक, घोडगे चौक आणि भाटे चौक येथे आवश्यकतेप्रमाणे रात्रं -दिवस ट्रॅफिक वार्डन नेमण्यात येणार आहे.

या व्यतिरिक्त महा मेट्रोद्वारे फूटपाथची डागडूजी करण्यात आली आहे व परिसरात योग्य ठिकाणी ट्राफिकविभागाच्या सुचनेनुसार वाहतूक सूचना फलक लावण्यात आले आहे.जागो-जागी योग्य ती चिन्हे लावण्यातआली आहे. आणि परिसरात शक्य असेल त्याठिकाणी महा मेट्रो द्वारे रस्त्याची रुंदी वाढविण्यात आली आहे.या बैठकीत ज्या पर्यायांची चर्चा झाली त्याची ट्रायल येत्या एक-दोन दिवसांत करण्यात येईल व त्यानंतर योग्यतो वाहतूक नियमन प्लानची अंमलबजावणी करण्यात येईल पोलिसांनी व मेट्रो अधिकाऱयांनी संयुक्त पणे सांगितले.